परिपत्रक बीसी १२३
आरबीआय/२००८-०९/४३१ एप्रिल १३, २००९
डीबीओडी. क्र. एलईजी. बीसी १२३/०९.०७.००५/२००८-०९

सर्व अधिसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

**अपंगत्व असलेल्या व्यक्तींना बँकशाखा/एटीएम पर्यंत पोहोचता येण्याची गरज**

आमच्याकडे, भारत सरकारसह अन्य ठिकाणांहून सूचना येत आहेत की, अपंगत्व असलेल्या व्यक्तींना बँकशाखा/ एटीएम्स पर्यंत पोहचता यावे ह्यासाठी उतार (रॅप्स) उपलब्ध करुन द्यावेत, जेणेकरुन व्हीलचेअर्सवरील व्यक्तींना तेथपर्यंत जाता येईल व एटीएम मशीनची उंचीही त्यांच्यासाठी योग्य असेल. ह्याशिवाय, आमच्याकडे अशाही सूचना येत आहेत की डोळ्यांनी अधु असलेल्या व्यक्तींना लाभ मिळावा ह्यासाठी बोलणारे सॉफ्टवेअर स्थापन करुन ब्रेल लिपीतील अक्षरे असलेली की - पॅड्स ठेवली जावीत.

२) आम्ही वरील सूचनांचे परीक्षण केले असून, बँकांना सांगण्यात आले आहे की त्यांनी **विद्यमान/भावी एटीएम्सजवळ रँप्स** ठेवण्यासाठी योग्य ती पाउले उचलावीत, जेणेकरून व्हीलचेअर्स/अपंग व्यक्ती तेथेपर्यंत पोहचू शकतील. तसेच एटीएमची उंची ही त्या व्हीलचेअर वरील ग्राहकांना अडचणीची ठरु नये अशी व्यवस्थाही करावी. **त्याचबरोबर बँकांनी, त्यांच्या शाखेसमोर रँप्स ठेवण्याची व्यवस्था करावी** जेणेकरुन अपंग व्यक्ती/व्हीलचेअर वापरणारे बँकेत सहजपणे प्रवेश करुन आपला व्यवहार विशेष अडचण न येता करु शकतील

३) ह्याशिवाय, बँकांनी किमान एक तृतीयांश एटीएम्स हे बोलणारे व ब्रेल लिपीतील की पॅड्स असलेले करावेत. आणि ते अशा प्रकारे ठेवावे की, अधु दृष्टी असलेल्या व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, प्रत्येक क्षेत्रभागात, बोलणारे व ब्रेलमधील कीपॅड्स असलेले किमान एकतरी एटीएम्स ठेवलेली ठिकाणे बँकांनी त्याच्या अधु दृष्टीच्या ग्राहकांना कळवावीत.

आपला,
(प्रशांत शरण)
मुख्य प्रभारी महाव्यवस्थापक